**मे. अंबुजा कॉन्क्रीट नॉर्थ प्रा. लि.(ACNPL) ने ६ एमएमटीपीए (२ x ३ एमएमटीपीए) क्षमता असलेला सिमेंट उत्पादनाकरिता स्टँड अलोन ग्राइंडिंग युनिट मौजे मालखेड ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती व मौजे उदखेड, ता. जि. अमरावती या प्रस्तावित ग्रीनफील्ड प्रकल्पाची पर्यावरणीय अनुमती मिळण्यासाठी दि. २७.०३.२०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्प स्थळ, मौजे मालखेड, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती येथे दुपारी १२.०० वाजता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---

मे. अंबुजा कॉन्क्रीट नॉर्थ प्रा. लि.(ACNPL) च्या ६ एमएमटीपीए (२ x ३ एमएमटीपीए) क्षमता असलेला सिमेंट उत्पादनाकरिता स्टँड अलोन ग्राइंडिंग युनिट मौजे मालखेड ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती व मौजे उदखेड, ता. जि. अमरावती या प्रस्तावित ग्रीनफील्ड प्रकल्पासाठी पर्यावरणीय अनुमती प्राप्त करण्याकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला. केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय (केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय) यांचे दि. १४.०९.२००६ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार सदर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आली होती. भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट उद्योग प्रकल्पांना आगाऊ पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. २७.०३.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रस्तावित प्रकल्प स्थळ, मौजे मालखेड, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती येथे घेण्यात आली. सदर जाहिर लोकसुनावणीकरीता मा. सदस्य सचिव म.प्र.नि. मंडळ, मुंबई यांनी आदेश क्र. **E-18 of 2025 पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-250307-FTS-0029 दि.07/03/2025** अन्वये लोकसुनावणी समीती गठन आदेश पारीत केलेला होता.

सदर जाहिर लोकसुनावणीस खालीलप्रमाणे जाहिर लोकसुनावणी समितीचे सदस्य उपस्थितीत होते.

१. मा. श्री अनिल भटकर, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, अमरावती — अध्यक्ष
२. श्री. सं. दे. पाटील, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अमरावती — सदस्य
३. श्रीमती धनश्री पाटील, उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अमरावती-१ — समन्वयक

सदर जाहिर लोकसुनावणी बाबतची सुचना दैनिक लोकमत (मराठी) व दैनिक टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या बृत्तपत्रामध्ये दि. २४.०२.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. २७.०३.२०२५ रोजी घेण्यात आली.

मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी तथा निवासी उपजिल्हादंडाधिकारी श्री अनिल भटकर यांचे परवानगीने लोकसुनावणी सुरू करण्यात आली. सर्वप्रथम लोकसुनावणी समितीचे समन्वयक श्रीमती धनश्री पाटील, उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अमरावती-१ यांनी सर्व उपस्थितीतांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

मे. अंबुजा कॉन्क्रीट नॉर्थ प्रा. लि.(ACNPL) मौजे मालखेड, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांनी सादर केलेले पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) परीसरातील नागरीकांना/गावक-यांना/संबंधीत पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्थांना अवलोकनार्थ खालील ठिकाणी ठेवण्यात आलेले होते.

१. पर्यावरण विभाग, नविन प्रशासन भवन,१५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई.
२. प्रादेशिक कार्यालय पर्यावरण, वने आणि हवामान बदल, मंत्रालय, भारत सरकार,१०४/१२८ रेड क्रॉस सदर रोड, नागपुर.
३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ(पु)मुंबई-४०००२२
४. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी बापटवाडी, विवेकानंद कॉलनी जवळ, अमरावती - ४४४६०६
५. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी बापटवाडी, विवेकानंद कॉलनी जवळ, अमरावती-४४४६०६
६. जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती,
७. जिल्हा परिषद, अमरावती,
८. जिल्हा उदयोग केंद्र, अमरावती
९. उप-विभागीय कार्यालय –अमरावती/ चांदूर रेल्वे/नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती
१०. तहसिल कार्यालय – अमरावती /चांदूर रेल्वे/नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती.
११. ग्रामपंचायत कार्यालय- कोहळा, कवठाकडु, मालखेड, धानोरा, दहीगाव, लालखेड, काठेवाडी हेटी, ता.चांदूर रेल्वे जि. अमरावती, म्हसाळा, एरंडगाव ता. नांदगाव खं. जि. अमरावती, उदखेड, कस्तुरा, मोगरा, पार्डी, वडगाव जिरे, ता.जि. अमरावती

श्रीमती धनश्री पाटील, उपप्रादेशिक अधिकारी, अमरावती-१ यांनी प्रकल्प समन्वयक यांना मे. अंबुजा कॉन्क्रीट नॉर्थ प्रा. लि.(ACNPL) प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची विनंती केली. त्यानंतर प्रकल्प समन्वयक यांचे वतीने पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाबाबत सादरीकरण दिले.

श्रीमती धनश्री पाटील, उपप्रादेशिक अधिकारी अमरावती-१ यांनी सांगीतले की, सदर मे. अंबुजा कॉन्क्रीट नॉर्थ प्रा. लि.(ACNPL) प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास वृत्तपत्रांमधे लोकसुनावणीची जाहीरात प्रसिद्ध झाल्याचे दिवसापासून ३० दिवसांच्या कालावधीमध्ये कार्यालयास लेखी स्वरूपात सुचना/आक्षेप प्राप्त झालेले नाही. तथापी लोकसुनावणीच्या दरम्यान उपस्थितांकडून एकुण १०६ सुचना/निवेदन/आक्षेप लेखी स्वरूपात प्राप्त झाले. त्याबाबतचे विवरण सहपत्र-१ सोबत जोडलेले आहे. तसेच त्यांनी सदर प्रस्तावाबाबत उपस्थितांच्या काही सुचना/आक्षेप असल्यास त्याप्रमाणे मांडावेत अशी विनंती उपस्थितांना केली.

मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांना आपले प्रश्न विचारतांना स्वत:चे नाव व गावाचे नाव सांगुन प्रश्न विचारण्याबाबत सुचित केले.

श्री सुभाष खंडार, रा. उदखेड यांनी सांगीतले की, जे बुकलेट पाठविले आहेत त्यामध्ये कुठेही तक्रारी पाठविण्याबाबत उल्लेख नाही. ज्या वर्तमान पत्रांमध्ये जाहीरात दिली आहे ती वृत्तपत्रे या भागात फार कमी प्रमाणात चालतात. प्रदूषण विभागाने या प्रकल्पाबाबत कोणतीही माहिती दिली नाही. या प्रकल्पासाठी उदखेड व मालखेड या गावांचीच जमीन खरेदी करण्यात आली असून पंच्याहत्तर टक्के जमीन उदखेडची आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी उदखेड गावाला प्राधान्य न देता मालखेडच्या नावाने

प्रकल्प ओळखला जाईल. या भागात भूगर्भातील पाण्याची पातळी फार कमी आहे. या भागातील शेती भूगर्भातील पाण्यावरच अवलंबून आहे. प्रकल्पासाठी भूगर्भातुन पाणी घेतले तर भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होईल. परिणामी शेतीसाठी पाणी राहणार नाही. प्रकल्पातील धुळीमुळे गावातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात जाईल. प्रकल्पाच्या अवजड वाहनांमुळे गावातील रस्ते खराब होतील.

मा. अध्यक्ष यांनी सुचित केले की, आपण सुचविलेल्या मुद्दयांची नोंद घेण्यात आलेली आहे. कंपनी मार्फत सदर मुद्दयांबाबत स्पष्टीकरण देण्यात येईल. रोजगाराबाबत मा. अध्यक्षांनी सांगीतले की, कोणत्याही कंपनी मधे स्थानीकांना प्राधान्य दिल्या जाते. या कंपनीमधे सुदधा स्थानिकांना त्यांच्या कुशलतेनुसार रोजगार देण्यात येईल. उपप्रादेशिक अधिकारी तथा संयोजक, म.प्र.नि. मंडळ, अमरावत-१ यांनी सांगीतले की, सदर प्रकल्पाच्या जाहीर लोकसुनावणीबाबतची सुचना पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना दि. १४/०९/२००६ मधील तरतुदीनुसार दै. लोकमत या मराठी व दै. टाईम्स ऑफ इंडीया या इंग्रजी वृत्तपत्रांमधे दि. २४/०२/२०२५ रोजी प्रकाशित करण्यात आलेली असून त्यामधे सदर प्रकल्पाबाबत सुचना/टिकाटिप्पणी किंवा आक्षेप जाहीरात प्रसिदध झाल्यापासुन ३० दिवसांचे आत म.प्र.नि. मंडळाच्या कार्यालयामधे कार्यालयीन वेळेत सादर करण्याबाबत उल्लेख करण्यात आलेला होता. तसेच म.प्र.नि. मंडळाच्या अधिका-यांनी सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषय सुनावणी बाबतचे दस्तऐवज ग्रामपंचायत कार्यालय, उदखेड या ठिकाणी नागरीकांना अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्यात आले होते.

श्री जीवन देशमुख, रा. मालखेड यांनी विचारणा केली की, कंपनीला लागणारे पाणी कुठून घेण्यात येणार आहे. तसेच वृक्षारोपन किती करण्यात येणार आहे. यावर मा. अध्यक्ष यांनी कंपनीमार्फत ३३% टक्के जागेवर वृक्षारोपन करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

श्री मोतीराम चव्हाण, रा. लालखेड यांनी सांगीतले की लालखेड गावातील मुलांना रोजगार मिळाल्यास त्यांची या प्रकल्पाला संमती आहे.

श्री मनोज इंगळे, रा. मालखेड यांनी सांगीतले की त्यांचा या कंपनीला सक्त विरोध आहे. कंपनीमुळे किती किलोमीटर पर्यंत प्रदूषण होईल हे कंपनीने सांगावे. गावातील एखादया परिवारातील इसमाला कर्करोग झाला तर कंपनी जबाबदारी घेईल काय? धुळीचे कण हवेत ऊडून श्वसनाचे रोग होतील. कंपनीने भूपृष्ठातुन पाणी काढल्यामुळे भूजल पातळी कमी होईल. कंपनीच्या प्रदूषणामुळे शेतीचे उत्पादन कमी होईल. उत्पादन कमी झाल्यास कंपनी भरून देणार काय? कंपनीच्या रस्त्यांवर चालणा-या वाहनांमुळे रस्त्यांवर खड्डे पडतील ते खड्डे कंपनी दर दोन महिन्यांनी दुरूस्त करेल काय? रस्त्यांवर चालणा-या वाहनांच्या हॉर्न मुळे ध्वनी प्रदूषण होणार नाही काय? कंपनीमधे काम करणा-या मजुराला कंपनीतर्फे किती रूपये मजुरी देण्यात येणार?

याबाबत कंपनी तर्फे स्पष्टीकरण देण्यासाठी आग्रह केला असता कंपनी प्रतिनीधीने सरकारी नियमानुसार मजुराला वेतन देण्यात येईल असे स्पष्ट केले. तसेच त्यांनी ८० टक्के रोजगार हा स्थानीकांना देण्यात येणार असल्याचे सांगीतले.

मा. अध्यक्षांनी स्पष्ट केले की, कोणत्याही कंपनीला शासनाच्या विविध विभागांच्या कायदयांचे पालन करणे बंधनकारक आहे. कंपनीतर्फे कायदे पाळले जात नसतील तर कंपनी विरोधात कारवाई होवू शकते. उपस्थित तीनही प्रश्नांची नोंद इतिवृत्तामध्ये घेण्यात येत आहे.

श्री राजकुमार चव्हाण, रा. लालखेड, यांनी गावातील सुशिक्षीत मुलांना रोजगार मिळावा तसेच गावातील महिलांना सुद्धा रोजगार देण्यात यावा अशी इच्छा व्यक्त केली.

श्रीमती सुषमा चौघडे, रा. मालखेड यांनी कंपनीचे स्वागत असून गावातील लोकांच्या आरोग्याची काळजी कंपनीने घ्यावी असे मत व्यक्त केले. तसेच गावातील लोकांना व सुशिक्षीतांना गावातच रोजगार मिळाला तर दुस-या शहरात जावून नोकरी करण्याची आवश्यकताच राहणार नसल्याचे सांगीतले. तसेच महिलांना सुदधा रोजगार मिळावा असे मत व्यक्त करून कंपनीला समर्थन असल्याचे सांगीतले. तसेच प्रदुषणामुळे शेतीचे नुकसान होवू नये असे मत व्यक्त केले.

मा. अध्यक्षांनी सांगीतलेले की, उपस्थित केलेल्या सुचना योग्य आहेत. प्रदुषणामुळे शेतीचे नुकसान होवु नये या मुद्दयाची सुध्दा नोंद घेण्यात आलेली आहे.

श्री.सुधाकर जाधव, रा. मोगरा यांनी गावातील सुशिक्षीत मुलांना व महिलाना रोजगार मिळावा असे मत व्यक्त करून कंपनीला समर्थन असल्याचे सांगीतले.

श्री निरंजन राठोड, माजी सरपंच, रा. लालखेड यांनी कंपनीच्या प्रदूषणामुळे वाढणा-या आजारावर कंपनीमार्फत काय उपाययोजना करण्यात येतील अशी विचारणा करून कंपनीच्या सभोवताली असणा-या गावातील लोकांना आज रोजी कोणत्या प्रकारचे आजार आहेत याबाबत सर्वेक्षण करण्याबाबत सुचित केले.

श्री जगताप, रा. उदखेड यांनी या भागातील लोकांची उपजिवीका ही शेतीवर अवलंबुन असून कंपनी सुरू झाल्यानंतर त्याचे शेतीवर कोणत्या प्रकारचे प्रदूषण होणार आणि त्यावर कंपनीमार्फत काय उपाययोजना आहेत अशी विचारणा केली. प्रदूषण नियंत्रण मंडळाने या प्रकल्पापासुन प्रदूषण होवू नये याकडे लक्ष द्यावे. तसेच स्थानिकांना रोजगार मिळावा असे मत व्यक्त केले.

श्री अनिल सोनटक्के, ग्राम पंचायत सदस्य, मालखेड, यांनी कंपनीमधे माल वाहतुक करणा-या वाहनांमुळे होणारे प्रदूषण किंवा इतर प्रकारे होणा-या प्रदूषणावर कंपनीने उपाययोजना कराव्या अशी सुचना केली. तसेच मालखेड गावाजवळून ४५ कि.मी. असणा-या वरूड बगाजी धरणावरून १० कि.मी. परिसरातील सर्व गावांना पाणी पूरवठा करण्यात यावा व कंपनीसाठी सुद्धा धरणाचेच पाणी वापरावे जेणेकरून परिसरातील जमीनीतील पाण्याची पातळी कमी होणार नाही अशी मागणी केली. तसेच परिसरातील मागील १५ वर्षापासुन रहिवाशी असलेल्या लोकांनाच रोजगार देण्यात येईल अशी हमी कंपनीने द्यावी असे सुचविले.

श्री अमोल चंदने, ग्रामपंचायत सदस्य, बारखेडी यांनी विचारणा केली की, या प्रकल्पामुळे मानवी आरोग्यावर काय परिणाम होतील? या प्रकल्पामुळे परिसरातील शेतीच्या उत्पादनावर काय परिणाम होईल? तसेच कंपनीतर्फे परिसरातील नागरीकांच्या सुविधेकरीता सुसज्ज हॉस्पीटल उभारण्यात येणार आहे का? अशी विचारणा केली.

श्री रवि कलाने, पत्रकार, रा. मालखेड यांनी या सुनावनी बाबत पत्रकारांना कळविण्यात आले नाही तसेच या सुनावणीबाबत ब-याच लोकांना माहिती नाही असे सांगीतले. या कंपनीमुळे होणा-या प्रदूषणामुळे परिसरातील नागरीकांना श्वसनाचे आजार किंवा इतर आजार होतील त्यासाठी कंपनीने हॉस्पीटलची व्यवस्था केली आहे का? किंवा नागरीकांना वैदयकिय विमा देण्यात येणार आहे का? अशी

विचारणा केली. तसेच कंपनी तर्फे करण्यात येणारे ३३ टक्के वृक्षारोपन प्राधम्याने करण्याबाबत सुचित केले. कंपनीमधून निघणारे सांडपाण्याची काय व्यवस्था करण्यात आलेली आहे याबाबत कंपनीने माहिती द्यावी अशी मागणी केली. कंपनी सुरू झाल्यानंतर आम्लयुक्त वर्षा होवून उत्पादन कमी झाल्यास कंपनी विमा देणार का? या कंपनीसाठी लागणारा कच्चा माल हा रेल्वे मार्फत वाहतुक केला जाईल तथापी गाव रस्त्यावरून वाहतुक करण्यात आल्यास रस्ते खराब होतील त्यामुळे रस्ते बांधकामाबाबत कंपनीकडे तरतुद आहे का? अशी विचारणा केली.

मा. अध्यक्ष यांनी सांगीतले की, बरेच प्रश्न, सुचना वारंवार सांगण्यात येत असून कंपनीमार्फत त्यावर उत्तर दिले जाणार आहे.

श्रीमती गुंजाबाई राठोड, रा. लालखेड यांनी सदर कंपनीमधे वृक्षारोपनाकरीता व इतर कामाकरीता तरूण मुलांना व महिलांना रोजगार देण्यात यावा अशी विनंती केली.

श्रीमती लता लक्ष्मणराव पाटील, रा. मालखेड यांनी सांगीतले की, सदर कंपनीबाबत प्रदूषण विभागाने दिलेल्या अहवालानुसार कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही. मात्र झाल्यास प्रदूषण विभाग जबाबदार राहील.

श्री दारासिंग चव्हाण, उपसरपंच, ग्रामपंचायत लालखेड यांनी कंपनीमुळे लालखेड, मालखेड, पार्डी व उदखेड इ. गावांतील व परिसरातील सुशिक्षीत बेरोजगारांना व महिलांना रोजगार मिळेल अशी इच्छा व्यक्त केली.

श्री दिनकर कानतोडे, रा. उदखेड पार्डी यांनी ज्या शेतक-यांची जमीन कंपनीने विकत घेतली आहे त्या शेतक-यांच्या मुलांसाठी कंपनीने काय तरतुद केली आहे अशी विचारणा केली. याबाबत उदयोगाच्या वतीने उपस्थित प्रतिनीधी यांनी शैक्षणीक पात्रते नुसार रोजगार देण्यात येईल असे स्पष्ट केले.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी उपरोक्त सर्व विषयाबाबत कंपनीतर्फे विचारलेले प्रश्न, सुचना/ टिकाटिप्पणी यावर सविस्तर स्पष्टीकरण देण्यात यावे असे सुचित केले.

कंपनी प्रतिनीधी यांनी स्पष्ट केले की, सदर प्रकल्प हा स्टँड अलोन ग्राइंडींग युनिट चा असुन येथे कोणत्याही दगडाचा वापर केला जाणार नाही. यासाठी लागणा-या कच्च्या मालाची वाहतुक ही रेल्वे मार्गाने करण्यात येईल. रोजगाराबाबत कंपनीतर्फे स्पष्ट करण्यात आले की, केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या नियमानुसार तसेच कामगारांच्या कुशलतेनुसार रोजगार देण्यात येईल त्यामधे स्थानिकांना प्राधान्याने रोजगार दिला जाईल. प्रदूषणाबाबत कंपनीतर्फे स्पष्ट करण्यात आले की, हा प्रकल्प अत्याधुनिक स्वरूपाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे वायु प्रदूषणाचा कोणताही धोका राहणार नाही. प्रकल्पासाठी लागणारे पाणी हे भूजल व भूपृष्टावरील पाणी यांचा अभ्यास करून सरकारचे मत व ग्रामस्थांचे मत विचारात घेवूनच वापरले जाईल. या कंपनीपासुन कोणत्याही प्रकारचे औदयोगीक सांडपाणी निर्मीत होणार नाही. कंपनीमधे कामगारांसाठी वापरण्यात येणा-या पाण्यापासून निर्मीत होणा-या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येईल व सदर प्रक्रिया केलेले सांडपाणी हे हरीत पट्टा विकसीत करण्याकरीता वापरण्यात येईल.

श्री घनशामजी ब्राम्हणे, सरपंच, वडगाव जिरे, यांनी कंपनीला लागुन असलेल्या शेतीच्या उत्पादनावर कंपनीच्या प्रदूषणामुळे परिणाम झाल्यास संबंधीत शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कंपनीने तसेच शासनाने व्यवस्था करावी अशी मागणी केली.

श्री अक्षय मेश्राम, सरपंच, पार्डी यांनी सदर कंपनीला विरोध असून ज्या शेतक-यांची जमीन या कंपनीने खरेदी केली तेच शेतकरी व त्यांची मुले बेरोजगार झाले असल्याचे मत मांडले. त्यांनी सदर कंपनीच्या ऊडणा-या धुळीमुळे शेतक-यांची शेती नापीक होणार असून कंपनीला विरोध असल्याचे सांगीतले.

श्री निरंजन चव्हाण, रा. लालखेड यांनी कंपनीमुळे गावातील बेरोजगारांना रोजगार मिळेल असे मत व्यक्त करून कंपनीला समर्थन असल्याचे जाहीर केले.

मा. अध्यक्ष यांनी सांगीतले की, या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या सुचना, आक्षेपांची दखल कंपनीने घ्यावी व त्यानुसार उपाययोजना कराव्यात. तसेच मा. अध्यक्ष यांनी उदयोगाच्या प्रतिनिधीं यांना उपस्थित गावक-यांनी विचारलेले प्रश्न अथवा सुचना याबाबत पुन:श्च स्पष्टीकरण, माहिती देणेबाबत सुचित केले.

याबाबत कंपनी प्रतिनीधी तर्फे सी.एस.आर. निधीबाबत माहिती देण्यात आली. त्यामधे विविध प्रकारचे कार्य केले जातात जसे की, शैक्षणीक गुणवत्ता सुधारणा, शाळांची सुधारणा, महिला सक्षमीकरणामधे बचत गट चालविणे, मानवी आरोग्यासाठी कंपनीमार्फत दर आठवडयाच्या ठरविलेल्या दिवशी व्हॅन मार्फत गावातील लोकांची आरोग्य तपासणी केली जाते व औषधोपचार केले जातात, कंपनीमार्फत कुशल अकुशल सुशिक्षीतांना कौशल्याबाबतचे प्रशिक्षण देवून त्यांना रोजगार देण्यात येतो, शेतक-यांना कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय इ. प्रशिक्षण देवून व्यवसाय वाढीबाबत प्रोत्साहन देण्यात येते, पाणी अडवा पाणी जिरवा अभियानाअंतर्गत कामे केली जातात, गावातील रस्ते दुरूस्ती, पांदन रस्ते, सार्वजनिक भवन इ. कामे करण्यात येत असल्याचा उल्लेख करण्यात आला.

श्री अशोक निंदाने रा. पार्डी यांनी कंपनीने १०० एकर जमीन खरेदी केलेली असून कंपनीमार्फत अजुन किती एकर जमीन खरेदी करण्यात येणार आहे अशी विचारणा केली. याबाबत उदयोगाचे प्रतिनीधी यांनी सध्या कंपनीतर्फे नवीन जमीन खरेदी करण्याबाबत नियोजन नसल्याचे सांगीतले.

मा. अध्यक्षांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| ( धनश्री पाटील ) | ( सं. दे. पाटील ) | ( अनिल भटकर ) |
| समन्वयक | सदस्य | अध्यक्ष, लोकसुनावणी समिती |
| तथा | तथा | तथा |
| उप- प्रादेशिक अधिकारी | प्रादेशिक अधिकारी | अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, |
| म.प्र.नि.मंडळ, अमरावती-१ | म.प्र.नि.मंडळ, अमरावती | अमरावती |